नि - ४७

हुकुमनामा

बारामती येथील मे सिव्हील जज्ज, सिनि डिव्ही सौ. यांचे कोर्टात

रे.मू.नं.१५३/२०२४

श्री.नारायण गोविंद पिसाळ वय ः ६० वर्षे, धंदा ः शेती रा.गुणवडी ता.बारामती जि.पुणे	}	वादी
विरुध्द		
श्रायबर डायनामिक्स डेअरी इंडस्ट्रीज ली, कंपनीज ॲक्ट नुसार रजिस्टर झालेली कंपनी या कंपनी चे मुख्य कार्यकारी अधिकारी **मा. जितेंद्र जाधव** भिगवण रोड, एम.आय.डी.सी.बारामती ता.बारामती, जि.पुणे	}	प्रतिवादी

दा.दा.ता - १५-०३-२०२४
दा.नों.ता - १६-०३-२०२४
दा.नि.ता - ०१-०७-२०२६

मे.कोर्टा च्या हुकुमानुसार निशाणी ३७ अन्वये दुरुस्ती

दावा स्पेकिफिक रिलीफ ॲक्ट कलम ३४ व ३८ अन्वये दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईचा विषयाची किंमत

याकामी उपरोक्त वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते येणेप्रमाणे

१) **मिळकतीचे वर्णन :-** तुकडी पुणे व जिल्हा पुणे पोट तुकडी व तालुका बारामती में दुय्यम निबंधक सो बारामती यांचे हद्दीतील गाव मौजे गुणवडी येथील शेतजमीन हा या दाव्याचा विषय असे.

गट नं.	क्षेत्र हे.आर	आकार रू.पैसे
४९९	०२.१३	

यासी चातुःसीमा ः

पूर्वेस ः पाण्याचा पाट व त्या पलीकडे गट नं.४९१,२९२

दक्षिण ः रस्ता व त्या पलीकडे गट नं.४९८

पश्चिमेस ः गट नं.५००

उत्तरेस ः गट नं.४९०,४९१

सदरील गटातील ७९ आर व बारमाही बागायत व १ आर विहीर पड क्षेत्र असे एकूण ८० आर बागायत शेतजमीन हा या दाव्याचा विषय असे.

यांसी चातुःसीमा ः

पूर्वेस ः पाण्याचा पाट व त्या पलीकडे गट नं.४९१,२९२

दक्षिण ः रस्ता व त्या पलीकडे गट नं.४९८

पश्चिमेस ः गटातील शिल्लक क्षेत्र

उत्तरेस ः गट नं.४९१

२) वर कलम (१) मधील मिळकत मुळची रामचंद्र बावाजी गाडेकर यांचे मालकीची होती. त्यांना मुलगा नव्हता. त्यांच्या मृत्यू नंतर वारसा हक्काने सदरची मिळकत त्यांची पत्नी सगुणाबाई व एकुलती एक मुलगी यशोदाबाई गोविंद पिसाळ नावे मालकीची झाली. सगुणाबाई हिचा सांभाळ तिच्या वृद्धापकाळी वादीने केला. त्यामुळे तिच्या मालकीची व वादीची आई यशोदाबाई हिच्या मालकीची जमीन गट नं.४९९ ही पूर्णपणे वादी कुटुंबिय वहिवाटीत होते. त्यामध्ये पुढे

कालांतराने वादीचे भाऊ दत्तात्रय व दिगंबर आणि वादी यांचे मध्ये वाटप होऊन दावा मिळकत ही वादीच्या हिश्यास देण्यास आली व दत्तात्रय यास ६८ आर आणी दिगंबर यास ६८ आर असे सोईनुसार वाटप करण्यात आले. सदरचे वाटप हे सगुणाबाई व यशोदाबाई या दोघी हयात असताना झाले होते. परंतु त्यावेळी या वाटपानुसार नोंदी झालेल्या नव्हत्या.

दरम्यानच्या काळात प्रतिवादीना बल्क कूलर स्थापणेसाठी काही जागेची गरज पडली. त्यामुळे त्यांनी वादी बरोबर चर्चा केली. त्यावेळी वादी अंतर्गत वाटपा नुसार जे क्षेत्र वाहिवाटीत होते. ते क्षेत्र म्हणजे दावा मिळकत प्रतिवादीना खरेदी देण्याचे ठरले. परंतु गावचे रेकॉर्डला सगुणाबाई व यशोदाबाई यांची नोंद असलेले खरेदीखत त्यांनी लिहून दिले व प्रतिवादीच्या आग्रहाखातर दोन्ही बंधुनी संमती किंवा मान्यता देणार म्हणून सह्या केल्या. हे खरेदीखत दि.०९/०९/१९९६ रोजी झाले.

३) खरेदीखत झाले असले तरी त्या ठिकाणी बल्क कूलर ची स्थापना प्रतिवादी कंपनीने केली नाही. कारण त्याच सुमारास बारामती सह. दूध संघाने त्याच गटातील काही क्षेत्र खरेदी करून त्या ठिकाणी बल्क कूलरची स्थापना केली. त्यामुळे एकाच ठिकाणी दोन-दोन बल्क कुलर नको म्हणून प्रतिवादी कंपनीने बल्क कूलर बसवण्याचे रहित केले. व जमीन तशीच पडीक राहिली, दरम्यानच्या काळात वादी आजारी पडल्यामुळे ते ही जमीन वाहिवाटीत नव्हते. त्यामुळे काही दिवस जमीन पडीक राहिली सन २००० पासून वादीने दावा मिळकत वाहिवाटण्यास सुरवात केली. तसेच वादी यांनी या मिळकती मध्ये बोअरवेल घेतले असून त्यावर पाणी उपसणेसाठी ३ एचपीचे विजेचे कनेक्शन घेतले आहे. व त्यावर दावा मिळकत भिजवून घेत आहेत. अश्या प्रकारे वादी

ने दावा मिळकती मध्ये आपली वहिवाट सुरू केल्यापासून आज पर्यन्त ती अव्याहत पणे चालू आहे. याची संपूर्ण माहिती प्रतिवादी कंपनीस होती व आज ही आहे. अशी वहिवाट २००० पासून दावा दाखल तारखे पर्यन्त अव्याहत पणे चालू आहे. या वाहिवाटीस प्रतिवादी तर्फे अगर अन्य कोणीही कधी ही हरकत केली नव्हती व नाही. अश्या प्रकारे दावा मिळकत ही प्रतिवादीच्या मालकीची असली तरी सदरची मिळकत वादी हे आमचीच मालकी आहे असे समजून अव्याहतपणे सन २००० पासून कोणताही अडथळा न येता प्रतिवादी देखत वहिवाटून उत्पन्न घेत होते व आहेत. त्यामुळे ते दावा मिळकतीचे विरुद्ध कब्जाने मालक झाले आहेत. परंतु कब्जेदार सदरी असलेल्या नोंदीच्या आधारे प्रतिवादी हे वादीच्या वाहिवाटीस हरकत करण्याची शक्यता निर्माण झाली. जमीन आमच्या ताब्यात द्या असे बजावले. त्यामुळे वादीना सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे.

४) खरेदी खत डायनामिक्स डेअरी इंडस्ट्रीज ली.या कंपनी सोबत झाले होते परंतु ती कंपनी आता अस्तित्वात नाही. सदर कंपनी प्रतिवादी कंपनीने takeover केली आहे. त्यामुळे सध्याची जि कंपनी श्रायबर डायनामिक्स आहे. त्या कंपनीस वादीला त्याच्या जमिनीतुन बेदखल करण्याचा अधिकार नाही. शिवाय प्रतिवादी कंपनीने ही वादीस यापूर्वी कधीही हरकत अडथळा केला नव्हता व नाही. त्यामुळे जरी सदर मालमत्ता प्रतिवादी कंपनी कडे हस्तांतरीत झाली असली तरी सन २००० पासून २०२४ म्हणजे दाव्याचे कारण घडलेले तारखे पर्यत त्यांनीही अडथळा ना हरकत वादीचे वहिवाटीस न केल्यामुळे त्यांचे विरुध्द ही ठराव करून मिळण्याचा वादीस विरुद्ध कब्जा मुळे हक्क आहे.

५) या दावा मिळकतीमध्ये वादी व त्यांचे कुटुंबीय यांची राहती वस्ती आहे. तिथे पक्की घरे आहेत व तश्या नोंदी ग्रामपंचायतच्या रेकॉर्डला आहेत. तसेच वादी हा दावा मिळकती मध्ये गहू, हरभरा अशी भुसार पिके व उसा सारखी पिके करून सदरचा ऊस वेळोवेळी वेगवेगळ्या साखर कारखान्याला पुरवीत असतो. पाण्याच्या उपलब्धे नुसार यामध्ये वादी सन २000 पासून वेगवेगळी भुसार पिके घेत आहेत. परंतु क्षेत्र कब्जेदार सदरी वादीच्या नावावर नसल्यामुळे वहिवाट सदरी सुरवातीचे काही काळ त्यापिकाची नोंद झाली नाही. मात्र सदरचे क्षेत्र वाहिती पड असे दर्शविण्यात आले. प्रत्यक्षात त्यामध्ये वादी पिके घेत होते. पुढे कालांतराने बारामती दूध संघाचे बल्क कूलर ही बंद करण्यात आले. त्यामुळे त्या ठिकाणी आजमितीला प्रतिवादीचा कोणत्या ही अर्थाने संबंध नाही. वादीची वहिवाट असून ही वहिवाट सदरी त्याची नोंद न नसल्यामुळे वादीने तशी नोंद करण्याबाबत मा. तहसीलदार बारामती यांचे कडे अर्ज केला तो प्रलंबीत आहे.

६) दाव्यातील मुख्य मागणी ही प्रतिवादी नं.१ विरुद्ध आहे. प्रतिवादी नं.२ व ३ यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील केले आहे. त्यांच्या विरुद्ध कोणतीही मागणी नाही.

७) **दाव्यास कारण** :- अशाप्रकारे वर नमूद केल्या प्रमाणे प्रतिवादीच्या अधिकाऱ्याकडे वादीस जमिनीचा एक महिन्या पूर्वी दि.११/0१/२०२४ रोजी ताबा मागितला असता प्रतिवादी नं.१ यांनी देण्यास नकार दिला त्यावेळी दाव्यास कारण घडले व नित्य घडत आहे.

८) **दाव्याची आकारणी** : दाव्याची आकारणी कोट फी कोर्ट अधिकार ॲड, फी यासाठी दावा शेत जमीनीचे मालकी हक्क ठरवून मिळणेकामी असल्याने महारष्ट्र

कोर्ट फीज ॲक्ट कलम ६ पोट कलम iv सह पोटकलम (d) सह ४ अन्वये जमिनीच्या शेतसा-याच्या २०० पट रक्कमेवर म्हणजे २८६ वर केली आहे. तसेच मनाईसाठी स्वतंत्र रुपये १०००/- वर केली असे.

९) कोर्ट अधिकार वादी प्रतिवादी दावा मिळकत या मे.कोर्टाच्या स्थळसिमेत असल्याने या मे कोर्टस सदरचा दावा चालवण्याचा अधिकार आहे.

१०) **तरी मे.कोर्टास नम्र विनंती की,**

अ) वादी हे दावा मिळकतीचे विरुद्ध कब्जेने मालक झाले आहेत. असा जाहीर ठराव करून मिळवा.

ब) प्रतिवादीनी दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी नं.१ ने जबरदस्तीने घेऊ नये व वादीच्या ताबे वाहिवाटीस हरकत करू नये अशी त्यांना निरंतरची ताकीद देण्यात यावी.

क) कारणपरत्वे दावा दुरुस्तीस परवानगी असावी.

ड) इतर योग्य ते न्यायाचे हुकूम व्हावेत.

आज दि. ०९ माहे जुलै सन २०२६ रोजी के. पी. नाम. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बारामती, जि. पुणे यांचे समोर वादी तर्फे ॲड. ज्ञानेश्वर शंकर पिसे व प्रतिवादी तर्फे ॲड. केदार पानसे यांचे समक्ष दावा तडजोड होवून निकालासाठी निघाल्यावरून नि. ७४ वर आदेश करणेत आला.

वादी व प्रतिवादी तर्फे संयुक्त तडजोड पुरसीस खालील प्रमाणे -

वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांचे विरूध्द वादी हे दावा मिळकतीचे विरूध्द बाजुचे मालक झाले आहेत असा जाहिर ठराव करून मिळणेकामी तसेच प्रतिवादीने दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी क्र. १ यांनी जबरदस्तीने घेवु नये व वादीच्या ताबे वहिवाटीस हरकत करू नये अशी त्यांना निरंतर ताकीद देणे कामी केलेला आहे.

दावा मिळकतीचे वर्णन:— तुकडी पुणे व जिल्हा पुणे पोट तुकडी व बारामती मे. दुय्यम निबंधक सो॥ बारामती यांचे हद्दीतील गाव गुनवडी येथील खाली वर्णन केलेली मिळकत शेतजमीन गट नं. ४९९ क्षेत्र ०२ हे १३ आर, आकार ३रू. ८१ पैसे

यांसी चतु:सिमा:—

पुर्वेस	पाण्याचा पाट व त्या पलीकडे गट नं. ४९१, २९२.
दक्षिणेस	रस्ता व त्या पलीकडे गट नं. ४९८.
पश्चिमेस	गट नं. ५००.
उत्तरेस	गट नं. ४९०, ४९१.

सरदील गटातील ७९ आर बारमाही बागायत व १ आर विहीर पड क्षेत्र असे एकुण क्षेत्र ८० आर बागायत शेतजमीन.

यासी चतु:सिमा:—

पुर्वेस	पाण्याचा पाट व त्या पलीकडे गट नं. ४९१, २९२.
दक्षिणेस	रस्ता व त्या पलीकडे गट नं. ४९८.
पश्चिमेस	सदर गटातील शिल्लक क्षेत्र.
उत्तरेस	गट नं. ४९१.

सदर प्रकरणी वादी यांची प्रतिवादी नं. २ व ३ यांचे विरूध्द काहीही मागणी नसलेमुळे सदर प्रतिवादी नं. २ व ३ यांना वादी यांनी सदर दाव्यातून कमी केले आहे.

वरील मिळकतीबाबत वादी यांनी प्रतिवादी यांचे विरूध्द सदर दावा दाखल केलेला आहे. सदर वादी व यातील सदर प्रतिवादी यांचे मध्ये मे. कोर्टाचे बाहेर बैठक बसून चर्चा झाली. त्यांचेमध्ये खालीलप्रमाणे तडजोड झालेली आहे.

सदर दावा मिळकतीमधील प्रतिवादी यांचे नावावरील क्षेत्र ८० आर हे प्रतिवादी यांनी विनोद दासा चौधर, सचिन बबन चौधर, हनुमंत तुकाराम दराडे, प्रविण तानाजी खाडे, शहाजी बाबाजी दराडे, नामदेव ज्ञानदेव दराडे, नवनाथ बबन चौधर, सुमन दासा चौधर यांना खरेदी देणेचे ठरलेले असून त्याबाबत या वादीची कोणतीही तक्रार नाही. प्रस्तुत प्रतिवादी हे दावा विषय क्षेत्र जे उपरोक्त नमुद व्यक्तींना विक्री करणार आहेत त्या बाबतची माहिती वादीस असुन संबंधीत खरेदी घेणार व्यक्तींसोबत या वादीने त्याच्या संबंधी काही गोष्टी ज्या दावा मिळकत व त्याचे हक्क अधिकार याबाबत आहेत त्याची निश्चिती केलेली असुन वादीस ते मान्य आहे. त्या गोष्टींशी या प्रतिवादी कंपनीचा काहीही संबंध नाही. प्रतिवादी कंपनीने त्यांच्या हक्क अधिकारांप्रमाणेच क्षेत्र विक्री करण्याचे ठरविले आहे. प्रस्तावित खरेदीदार व वादी यांच्यामध्ये भविष्यात जे काही करार होणार आहेत त्यास प्रतिवादी कंपनीची हरकत नाही तसे असण्याचे कारण नाही.

अशा समजुत व तडजोडींच्या वस्तुस्थितीमुळे आता वादीस प्रस्तुत दावा चालविण्याचा नाही.

<u>आदेश</u>

१. प्रकरण समेटपत्र (नि.क्र. ३९) व मध्यस्थ अहवाल (नि.क्र. ४०) च्या अनुषंगाने निकाली काढण्यात येत आहे.

२. समेटपत्र (नि.क्र. ३९) प्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

३. नियमाप्रमाणे कोर्ट फीची रक्कम संबंधिताच्या अर्जानुसार अदा करण्यात यावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—

दि. ०९/०७/२०२६

(पी. एम. पाटील)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर बारामती

खर्चाचा आकडा				
अ.क्र.	वादीचा खर्च	रक्कम	प्रतिवादी	रक्कम
१	अर्ज दाखल मुद्रांक नि.१	५००.००	....	००.००
२	वकिलपत्र मुद्रांक नि.२	१०.००	वकिलपत्र नि. १६	१०.००
३	प्रोसेस फि	००.००	——	००.००
३	वकिल फी	३००.००	वकील फी	३००.००
एकूण		८१०.००	एकूण	३१०.००

आज तारीख ०९ माहे जुलै सन २०२६ रोजी आमच्या सहिनिशी कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिला असे.

तयार करणार :—

(एस.डी.साळुंके)
क.लिपीक

वादी तर्फे वकिल — ॲड. ज्ञानेश्वर शंकर पिसे

प्रतिवादी तर्फे वकिल — ॲड. केदार श्रीवल्लभ पानसे

दि. ०९/०७/२०२६

(पी. एम. पाटील)
४ थे सह दिवाणी न्यायाधीश व स्तर
बारामती